# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com

दिनांक : ०६/०९/२०२३

## प्रेसनोट

पावसाळयापूर्वी व पावसाळया दरम्यान उल्हासनगर शहरात निर्माण झालेले खड्डे तात्पुरती व्यवस्था म्हणून खडीकरणाने भरण्यात आले व शहरातील वाहतूक व रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही असे नियोजन करण्यात आले . परंतु जुलै , ऑगस्ट महिन्यात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने खड्डयांचे प्रमाण वाढले. पावसामुळे डांबरीकरणाने खड्डे भरणे शक्य नव्हते . परंतु आता गेल्या काही दिवसात पावसाचे प्रमाण कमी झाले असल्याने शहरातील मुख्य रस्त्यावरील खड्डे डांबरीकरणाने भरण्याच्या कामास सुरवात झाली आहे .

दिनांक ०१/०९/२०२३ रोजी खड्डे भरण्यात येणा-या एजन्सीचे ठेकेदार यांचे समवेत मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली . सदर बैठकीत मा. आयुक्त यांनी गणेश उत्सव सण जवळ येत असल्याने गणेशोत्सवा पूर्वी शहरातील रस्त्यांवरील खड्डे डांबरीकरणाने भरणेच्या कामास युध्दपातळीवर सुरवात करुन रस्ते वाहतुकीस व रहदारीस सुस्थितीत करावेत अशा सक्तीच्या सुचना दिल्या. त्यानुसार कामे युध्दपातळीवर सुरु करण्यात आली आहे. दिनांक ०५/०९/२०१२३ रोजी शहर अभियंता यांनी हिराघाट, उल्हासनगर-३, नेताजी चौक रस्त्यांवर डांबरीकरणाने खड्डे भरणेची कामे युध्दपातळीवर सुरु आहेत. तसेच लवकरच उल्हासनगर शहर खड्डे मुक्त करणेकरीता महानगरपालिका प्रशासन सज्ज आहे. तसेच उल्हासनगर महापालिका क्षेत्रात मुख्य ७ रस्ते हे मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु करण्यात आलेले आहे व सदर रस्त्यावरील खड्डे भरून रस्ते सुस्थितीत ठेवणेबाबत अधिक्षक अभियंता (MMRDA) यांना कळविण्यात आले आहे. सदर ७ रस्त्यांवर खड्डे भरण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करण्यात येणार आहे.

6/9/23

(छाया प्रकाश डागळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.

मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.